प्रकरण - पाचवे

उपसंहार

मराठी वाङ्मयात कवितेचे दालन समृद्ध आहे. इ.स.१९८० नंतरच्या मराठी कवितेत नारायण सुमंत यांची कविता महत्वाची मानली जाते. प्रस्तुत प्रबंधात नारायण सुमंत यांच्या *रानभैरी, वृक्षवेद, सातबारा* या कविता संग्रहाच्या आधारे त्यांच्या काव्यलेखनाचा विचार केला आहे.

पहिल्या प्रकरणामध्ये नारायण सुमंत पूर्व कृषिजन विषयक कवितेचे स्वरुप पाहिले.

महात्मा फुले यांच्या लेखनापासून कृषिजनविषयक कविता लिहिली गेली असे म्हणण्यास हरकत नाही. महात्मा फुलेंनी सामाजिक कार्याबरोबर काव्यलेखनही केले. म.फुले यांनी शेतकऱ्यांच्या व्यथा, वेदना आपल्या लेखनाद्वारे लोकांसमोर आणल्या. त्यांनी ग्रंथरचनेबरोबर *शेतक-यांचा आसूड व अखंड*ही काव्यरचनाही केली. समाजातील अनेक घटक शेतकऱ्याच्या अज्ञानाचा गैरफायदा घेऊन त्यांना कसे नाडतात याचे चित्रण ते करतात. म.फुले यांनी शेतकऱ्यांचे दु:ख प्रथमच मराठी कवितेत मांडले.

याच काळात सत्यशोधक चळवळीमध्ये काम करणा-या कृष्णराव भालेराव, मुकुंदराव पाटील या समाजसेवकांनीही काव्य लेखन केले.

इ.स.१९२० नंतरच्या काळात मराठीमध्ये जानपद कविता म्हणून लोकप्रिय झालेली कविता लिहिली गेली. *रविकिरण मंडळ* व समकालीन काही कवींनी ही कविता लिहिली. खेडे व कृषिजीवन यांची परिपूर्ण माहिती नसल्याने या कवितेत अनेक चुका झालेल्या दिसतात. मा.रा.तांबेंनी *गुराख्याचे गाणे* ही कविता मे,१९०७ मध्ये लिहिली. याशिवाय आणखी काही कविता लिहिल्या त्यामध्ये त्यांची सौंदर्य दृष्टीच दिसून येते. याच काळात कवी चंद्रशेखर यांनीही *काय हो चमत्कार, किस्मतपूरचा जमीनदार, उगडं गुपित* अशी खंडकाव्येही लिहिली. कल्पनारम्यता हे या ग्रामीण जीवनावरील खंडकाव्याचे वैशिष्टय आहे.

युगी हा जानपद कवितांचा पहिला प्रातिनिधिक संग्रह इ.स.१९३३ मध्ये प्रसिद्ध झाला. त्याचे संपादन ग.ल.ठोकळ यांनी केले. तत्कालीन अनेक कवींच्या कविता या संग्रहामध्ये आहेत. काही कवींचा अपवाद वगळता अनेक कवींना वास्तववादी ग्रामीण जीवन रेखाटता आले नाही.

पां.श्रा.गोरे यांचा *बोबडे बोल* हा काव्यसंग्रह १९३२ ला प्रसिद्ध झाला. या कवितांमध्ये ग्रामीण जीवनातील दारिद्रय, दु:ख, परावलंबित्व यांचे गडद चित्रण झाले आहे. कवी गिरीश यांनी *आंबराई* हे

खंडकाव्य लिहिले. कल्पनारम्यता हे त्यांचेही वैशिष्ट्य आहे. कवी यशवंतांनीही कल्पनारम्य असे काव्यलेखन ग्रामीण जीवनावर केले. या काळात ग.ह.पाटील यांनी कृषिजन कवितेमध्ये उल्लेखनिय लेखन केले. *रानजाई (१९३४), लिंबोळ्या (१९६१),* हे त्यांचे वास्तववादाकडे झुकणारे काव्यसंग्रह होत. याचप्रकारे ग.ल.ठोकळ यांनीही *मीठ भाकर (१९३८)* हा काव्यसंग्रह लिहिला.

के. नारखेडे यांनीही या काळात कल्पनारम्य काव्यलेखन केले. तर सोपानदेव चौधरी यांच्या कवितेत कृषिजीवनावरील कविता फारच कमी आहेत.

इ.स.१९५२ मध्ये *बहिणाबाईची गाणी* या नावाने बहिणाबाई चौधरींचा काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला. ग्रामीण जीवनाचे सूक्ष्म, वास्तववादी व सुंदर चित्रण त्यांनी आपल्या कवितेत केले. शेती, शेतकरी जीवन, अध्यात्म, मानवीमनाचे सूक्ष्म चित्रण, असे अनेक विषय त्यांच्या कवितेत आले आहेत. एका अशिक्षित स्त्रीने जीवनाच्या सर्वच बाजूंचा सूक्ष्मपणे केलेला अविष्कार पाहून मन थक्क होते. त्यांच्या भाषेतही कमालीची गोडी आहे.

गद्यलेखन मोठ्या प्रमाणात करणा-या आनंद यादवांनी काव्यलेखनही केले आहे. *हिरवे जग (१९६०), मळ्याची माती (१९७८), माय लेकरं (१९८९)* अशी त्यांची काव्यरचना आहे. शेतकरी, शेती, ग्रामीण जीवन, त्यातील दारिद्रय, त्यांनी अनुभवलेला निसर्ग तसेच शेतक-याचे प्रेमजीवन याभोवती त्यांची कविता फिरत राहते. माय लेकरं हे प्रदीर्घ संवादकाव्य हा त्यांच्या काव्याचा विशेष आहे. जानपद कवितेतील चुका लक्षात घेऊन त्यांनी आपले काव्यलेखन केले. वास्तववादी व सखोल ग्रामजीवनाचे चित्रण त्यांच्या कवितेत येते. याशिवाय त्यांनी ग्रामीण साहित्याची समीक्षाही केली आहे.

इ.स.१९६० नंतर एक प्रतिभावंत ग्रामीण कवी उदयाला आला तो म्हणजे ना.धों.महानोर होय. *रानातल्या कविता (१९६७), वही (१९७१), पावसाळी कविता (१९८२), अजिंठा (१९८४), प्रार्थना दयाघना (१९९०)* हे त्यांचे काव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत. शेताशी एकरुप झालेले मन व त्यांचे भावानुभव कवितेमध्ये उतरले आहेत. शेताशी कमालीची एकरुपता हे त्यांच्या काव्याचे वैशिष्टय होय. *प्रार्थना दयाघना* सारख्या काव्यसंग्रहात त्यांनी बदलते ग्रामजीवनही रेखाटले आहे.

झोळणा या सरोजिनी बाबर यांच्या काव्य संग्रहातून मराठमोळ्या स्त्रीचे माहेर, सासर, मुलाबाळात रमलेले पारंपारिक कष्टाळू मन प्रकट होते. *तळातल्या साऊल्या* मध्ये पुरुषोत्तम पाटील यांनी प्रेमाला प्राधान्य देऊन काव्यलेखन केले. एकनाथ देशमुखांनी *ओळखी अनोळखी* काव्यसंग्रहात निसर्गप्रतिमातून स्त्री-पुरुष प्रेम चितारले आहे.

इ.स.१९८० पर्यंत कृषिजीवन विषयक कवितांचे स्वरुप अशा प्रकारचे आहे. म.फुल्यांच्या पासून सुरु झालेल्या या प्रवाहाला वेगवेगळी वळणे लागली. या कालावधीत म.फुले, बहिणाबाई चौधरी, ना.धो.महानोर यांनी आपला ठसा उमटविला हे दिसून येते.

दुसऱ्या प्रकरणामध्ये नारायण सुमंतांच्या कवितांची आशयसूत्रे पाहण्यात आली आहेत. सुमंतांच्या *रानमैरी, वृक्षवेद, सातबारा* या तीन काव्यसंग्रहामध्ये निसर्ग व वास्तववादी कवितांचा समावेश आहे. त्यांच्या कवितांचे आशयसूत्रानुसार खालील गट पडतात.

वृक्षाविषयक कविता

नारायण सुमंतांच्या सर्वाधिक कविता वृक्षांसंबंधी आहेत. त्यांच्या वृक्षांसंबंधीच्या कविता पाहिल्या की, हा कवी किती वृक्षाळलेला आहे हे लक्षात येते. वृक्षासंबंधी इतक्या मोठ्या प्रमाणात काव्यलेखन केलेला हा मराठीतील पहिलाच कवी असावा.

या गटामध्ये त्यांच्या वृक्षांचे सौंदर्य व वैशिष्ट्य व्यक्त करणा-या कविता आहेत. झाडे आभाळासारखी उंच असतात त्याचप्रमाणे ती जमीनीमध्येही खोलवर रुजलेली असतात. या मुळांनाही वेगवेगळे संदर्भ असतात. तसेच झाडाने फांदीफांदीत आकाशव्यापी डोळे मिटून ठेवलेले असतात. पण या फांद्यानाच उन्हाचे आभाळ दु:ख सहन करावे लागते. तरीही झाडे हिरवीगार व डेरेदार असा आकार धारण करतात. झाडे हंगामानुसार बदलत नाहीत तर ती हंगामानाच बदलतात. निसर्गाचे सर्व ऋतूचक्र बदलते पण ते झेलत झाडे ताठच राहतात. काहीवेळा निसर्गाच्या विरुद्धही वागतात. प्रत्येक झाडाचे वेगळेपण असते. हे वेगळेपण त्यांच्या आकारात असते. त्याचप्रमाणे त्यांच्या अंतरंगातही असते. या झाडांचे पक्ष्यांशी ही एक नाते असते. झाडी फांदीफांदीत पावसाला गोंदून घेतात. त्याचप्रमाणे झाडांना नैसर्गिक व अनैसर्गिक हानी सहन करण्याचे सामर्थ्य असते. दुष्काळामध्येही एखादे झाड बंड करून फुलते. त्याला कवी ते झाड तुकारामते असे म्हणतो. त्याचप्रमाणे झाडांना काही वेळेस बहरही काचत असतात. झाडाचा विस्तारही एका विशिष्ट पद्धतीनेच होत असतो. झाड एक प्रकारची अलिप्तता पत्करत असते. झाडे पावसावर बहरतात पण पाऊस दगडावर, माणसांवरही पडतो पण त्यांना पानेफुले येत नाहीत. झाड सर्वांशीच समानतेने वागते. भेदभाव करीत नाही. झाडांना हे झाडपण सहज साध्य नसते. अनेक संकटांचा सामना ते करत त्यातून जंगल निर्माण करते.

नारायण सुमंत यांनी तीन वेगवेगळ्या वृक्षांच्या वर्णनातून तीन व्यक्तीरेखा साकार केल्या आहेत. हादगा हा वृक्ष हळव्या, शेवरीही उच्छृंखल शृंगाराचे तर तरटी उपेक्षित वृत्तीचे प्रतिक मानून कवी त्यांचे वर्णन करतो.

झाडे ही निसर्गाचा घटक आहेत. त्यांचे पक्षांशी, वेलींशी, भोवतालच्या जंगलाशी एक प्रकारचे नाते असते. ते नाते ही कवी चितारताना दिसतो.

झाडांवर मानव कलम करतो. या कलमाचे गुणधर्म, वैशिष्टये ही कवी रेखाटताना दिसतो.

शहरीकरणामुळे मानवाने बागा निर्माण केल्या. पण बागेतील झाडांना जंगलपणाचे वैशिष्ट्य प्राप्त होत नाही. हेही कवी येथे नमूद करताना दिसतो.

झाडांना बहार असतो त्याप्रमाणे नाशही असतो. या वेदना व नाशांचे कवी वर्णन करताना दिसतो.

झाडे कुऱ्हाडहातांना फळे अर्पून देवाला फुलांचे कोंदण करतात. स्वत: तपस्या टाळून तपस्व्यांच्या डोक्यावर सावली धरतात. सर्वांशी समानतेने वागतात.

मानवाचे निसर्गाशी असणारे नातेही पुरातन आहे. मानव माकड होता त्यावेळी त्या झाडावरच वास्तव्य करून होता. झाडे मानवाला फळे अर्पितात, फुले देतात. चुलीसाठी सरपण देतात तरीपण मानव वृक्षांवर अन्याय, अत्याचार करतो.

झाडांच्या माध्यमातून कवी मानवी जीवनावर प्रकाशही टाकतो. काश्मीरप्रश्न, पाणीप्रश्न, दिशाहीन नवपिढीचा प्रश्न, समाजातील क्रांतीचा प्रश्न, परकीय आक्रमणतेचा प्रश्न, फुटीरतेचा प्रश्न कवी येथे वृक्षांच्या माध्यमातून मांडतो.

प्रेमकविता

नारायण सुमंत काही प्रेमकवितांतून निसर्गाचा प्रेमभाव व मानवातील प्रेमभाव व्यक्त करतात. प्रतिमांचा उत्कृष्ट वापर हे या प्रेमकवितांचे वैशिष्टय आहे. ते येथे निसर्ग प्रतिमांचाच वापर करतात.

शेतक-यांवरील अन्याय

शेतकऱ्यांवर होणारा अन्याय हा पारंपारिक आहे. राज्यकर्त्यांकडून हा अन्याय होतोच. त्याचबरोबर शेतकऱ्यांचा विश्वासघातही केला जातो. *वृषभसहस्रनामस्तोत्र* मध्ये हा अन्याय अधिकच प्रभाविपणे व्यक्त झाला आहे.

शेतकऱ्यांचे दु:ख

राज्यकर्ते, दुष्काळ, बाजारभाव, कर्जबाजारीपणा या सर्वांमुळे शेतकऱ्याला दु:ख प्राप्त होते. या दु:खाची गडद छाया येथे पडली आहे.

शेतजमिनीवरील आक्रमण व वाढते शहरीकरण

वाढत्या शहरीकरणाचा परिणाम शेतजमिनीवर होतो. त्याचे प्रतिबिंब नारायण सुमंताच्या कवितेत पडते. हे आक्रमण थोपवायचे असेल तर त्याविरुद्ध संघर्ष करायला हवा. असे कवीला वाटते.

बाजारभाव

शेतकऱ्याला सर्वात जास्त तोट्यात आणणा-या बाजारभावाबद्दल नारायण सुमंत पोटतिडकीने बोलताना दिसतात. ढासळते बाजारभाव, त्याचे शेतकऱ्यांवर होणारे परिणाम, यावर कवी भाष्य करताना दिसतो.

बदलते शेतकरी जीवन

शेतकऱ्यांचे जीवन बदलत आहे. तो ग्रीन हाऊस पद्धतीने शेती करीत आहे. उगवत असेल तरच पेरतो तर पारंपारिक शेती व्यवसाय सोडून शिक्षणही घेत आहे. या सर्वांचे प्रतिबिंब या कवितांत पडते.

दुष्काळ

दुष्काळाचे विदारक चित्रण नारायण सुमंतांची कविता करते. दुष्काळ, त्याचा शेती व्यवसायावर होणारा परिणाम, दुष्काळामुळे येणारे दारिद्रय, आधुनिक तंत्रज्ञानाचे पावसाचे फसवे अंदाज, शासनाचे भोंगळ धोरण या सर्व बाबींवर कवी प्रकाश टाकतो. शासनाच्या धोरणावर व आधुनिक तंत्रज्ञानावर लिहिताना कवीची शैली उपरोधाची होते.

राजकीय भाष्य करणारी कविता

अलीकडचे राजकारण व त्याचे शेतीवर होणारे परिणाम, त्याचप्रमाणे त्यामुळे अस्वस्थ शेतकरी यावर भाष्य करताना कवी दिसतो. अत्यंतिक उपरोधिक शैली हे या कवितांचे वैशिष्टय.

शेतकरी व शासन

शेतीसाठीचे शासनाचे धोरण कसे कूचकामी आहे हे या कवितांतून कवी स्पष्ट करताना दिसतो. मार्मिक भाष्य हे या कवितांचे वैशिष्ट्य होय.

साहित्यविषयक कविता

साहित्यामध्ये शेतकरी जीवनाचे चित्रण कसे फसवे आहे हे येथे कवी स्पष्ट करतो. त्याशिवाय शेतक-याच्या श्रमाचा पुरस्कार करणारी 'कवी' सारखी कविताही कवी लिहितो.

अशा प्रकारे नरायण सुमंतांच्या कवितांची आशयसूत्रे आहेत. या कवितांच्या आशयामध्ये विविधता आहे हे दिसून येते.

तिस-या प्रकरणामध्ये नारायण सुमंत यांच्या कवितांमधील आकृतिबंध, अविष्कारतंत्र, भाषा व शैलीचा विचार केला आहे. नारायण सुमंतांनी मुक्त छंदातून आपले काव्यलेखन केले आहे. आधुनिक कवितेवरच मुक्तछंदाचा मोठा प्रभाव आहे. त्या प्रभावातून नारायण सुमंतही सुटले नाहीत. काव्यलेखनाच्या सुरुवातीच्या काळात *रानमैरी* या काव्यसंग्रहात दोन प्रकारचे फॉर्म कवीने वापरले आहेत. एकामध्ये चार कडव्यांची कविता ते लिहिताना दिसतात. प्रत्येक कडव्यामध्ये चार चरणे. एका चरणात तीन ते चार शब्द. कडव्याच्या शेवटच्या चरणामध्ये व दुस-या चरणामध्ये यमक साधले आहे. अशा प्रकारच्या काही कविता आहेत. त्याचप्रमाणे तीन कडव्यांचीही कविता ते लिहितात. त्यामध्येही दुस-या व चौथ्या चरणामध्ये यमक साधले आहे. *रानमैरीच्या* पहिल्या विभागात या प्रकारच्या रचना आढळतात. पुढे मात्र ही सर्व बंधने सुमंत झुगारून देताना दिसतात. मुक्त छंदातच ते अधिक मुक्तपणे काव्य लिहिताना दिसतात. आपल्या विचारांना, भावनेला अविष्कार करता येण्यासारखा कोणताही आकृतिबंध स्वीकारताना ते येथून पुढे दिसतात.

रानमैरी तील झाडे या दुस-या विभागात व मुक्तछंद या तिस-या विभागात ते अधिक मुक्तपणे रचना करताना दिसतात. पुढे *वृक्षवेद* या काव्यसंग्रहातही त्यांच्या कवितेचा आकृतिबंध स्वैर अशा

स्वरुपाचा आहे. यमक, कडवे यांचे कोणतेही बंधन न पाळता ते काव्य लेखन करताना दिसतात. *सातबारा* या काव्यसंग्रहात त्यांच्या मुक्तछंदाच्या आकृतिबंधाचे स्वरुप अधिकच स्वैर झालेले दिसते. सुरुवातीच्या कवितांपासून शेवटच्य कवितांपर्यंत त्यांच्या आकृतिबंधाचे स्वरुप पाहिल्यास एक गोष्ट लक्षात येते, ती म्हणजे त्यांनी आपल्या विचारांना व भावनेला प्राधान्य देऊन काव्यलेखन केलेले दिसते. त्यामुळे कवितेच्या आकृतिबंधाला ते विशेष महत्व देताना दिसत नाहीत. साहजिकच त्यांच्या लेखनाद्वारे एक वेगळीच अशी त्यांची शैली निर्माण होते.

याशिवाय नारायण सुमंत आपल्या कवितेत प्रतिमा, प्रतिके, शब्दकळा, संवादमयी शैली, निवेदन पद्धती, परिणामकारक शेवट अशी काही अविष्कारतंत्रे व शैलीचा वापर करतात.

त्यांच्या प्रतिमासृष्टीतही विविधता आहे. निसर्ग प्रतिमा हे त्यांच्या काव्याचे वैशिष्टय होय. मोठ्या प्रमाणात त्यांनी निसर्ग कविता लिहिल्या असल्याने त्या कवितांमध्ये ते निसर्ग प्रतिमांचा वापर करतात. उदा. *रानमैरीतील* दुस-या कवितेत दिवस नभात.हळूहळू येतो त्याला दिस नभात लाजतू अशी प्रतिमा वापरतात. साहजिकच या प्रतिमेमुळे काव्यात शृंगारता येते. अशाच प्रकारच्या प्रतिमा ते आपल्या सर्व निसर्ग कवितेत वापरतात. त्याचप्रमाणे त्यांच्या वास्तववादी कवितेत ते त्याचप्रकारच्या प्रतिमा वापरतात. म्हणजेच, आशयानुसार प्रतिमांचा वापर हे त्यांचे वैशिष्ट्य होय. ते दृष्य प्रतिमांचा वापर करतात. त्याचबरोबर 'उन्हाचे आभाळ दु:ख', 'आकाशव्यापी उन्हाळभार', 'आकाशव्यापी डोळं' अशा अदृश्य प्रतिमांचाही वापर करतात. याशिवाय गंध, नाद अशा स्वरुपाच्या प्रतिमांचाही ते वापर करतात. एकूणच त्यांच्या प्रतिमांमध्ये विविधता दिसून येते.

याशिवाय ते प्रतिकांचाही वापर करतात. सुयोग्य प्रतिमांचा वापर हे त्यांचे वैशिष्ट्य होय. झाडांना पाणी घालणाऱ्या हातांसाठी कवी (रानमैरी-पाऊस पाडण्यासाठी) 'आभाळहात' हे प्रतिक वापरतो. तर *बापूजी आणि त्यांची बकरी (सातबारा)* या कवितेत 'बकरी' हे आत्ताच्या भ्रष्ट राजकीय नेत्यांसाठी प्रतिक कवी वापरतो. अशा काही प्रतिकांच्या द्वारे कवितेतील आशय घनता कवी वाढवतो. त्याचबरोबर काही ठिकाणी कवितेतील उपरोध वाढवण्यासाठी कवी या प्रतिकांचा वापर करतो.

आपल्या कवितेत नारायण सुमंत वेगळ्या अशा शब्दकळाही वापरतात. 'उफाडातलं पाऊल', 'खडूळ पानी', 'हिर्वी माया', 'थेंबांचा उरुस', 'काष्ठधारा', 'कु-हाडहात', 'तुकारामणे', 'पाषाण झुंज' अशा काही शब्दकळा त्यांच्या कवितेत आढळतात. येथेही काही कवितेत ग्रामीण शब्दांचा वापर तर काही कवितेत इंग्रजी शब्दांचा वापर, तर काही कवितेत संस्कृत शब्दांचा वापर ते करतात. त्यांच्या शब्दकळांतून

ग्रामीण लोकपरंपरेच्या खुणाही आढळून येतात. उदा.'सटीचं शिपणं', 'सुने' असे काही शब्द या संदर्भात पाहता येतील.

याशिवाय काही कविता संवादमय शैलीत लिहिले आहेत. उदा. 'लक्षवेधी', 'चित्र', 'उपग्रहप्राप्त', 'साक्षरऊस' (सातबारा) व 'माढा : एक संदर्भ' (रानमैरी) या कविता अशा शैलीमधील कवीने लिहिल्या आहेत.

रानमैरी व वृक्षवेद या काव्यसंग्रहामध्ये कवीने वर्णनपर निवेदन पद्धती वापरली आहे. तर *सातबारा* मध्ये आत्मनिवेदन / आत्मसंवादी निवेदन पद्धतीचा वापर ते करतात.

काही कविता कवितेच्या शेवटच्या दोन ओळीत कवितेला कलाटणी देणाऱ्या आहेत. ही त्यांची वेगळी शैली आहे.

अशा प्रकारे नारायण सुमंत यांच्या कवितेत अविष्कर तंत्र, भाषा, शैली व त्यांच्या कवितेचा आकृतिबंध अशा प्रकारचा आहे.

प्रकरण चौथ्यामध्ये नारायण सुमंतांच्या समकालीन कवींच्यामध्ये नारायण सुमंतांचे वेगळेपण शोधले आहे.

नारायण सुमंतांच्या समकालीन मध्ये विठ्ठल वाघ हे एक महत्वाचे नाव आहे. वऱ्हाडी प्रांतातील या कवीने आपल्या वेगळेपणाने मराठी कवितेत स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे. खास ग्रामीण पद्धतीने ते आपला अनुभव कवितेत चितारतात. निसर्ग प्रतिमांतून शृंगाराचे वर्णन करणे ही त्यांची खासियत आहे. प्रेमकवितेप्रमाणेच वास्तव ग्रामीण जीवनाचे चित्रणही ते आपल्या कवितांमध्ये करतात. शेतकऱ्यांच्या व्यथावेदना कवितेतून गातात. राजकीय भ्रष्टाचारावरही उपरोधिक टीका करतात. व-हाडी भाषेचा बाज त्यांच्या कवितेला लाभलेला आहे. गेयता हा त्यांच्या कवितेचा एक गुणविशेष आहे.

नारायण कुलकर्णी-कवठेकर हे एक इ.स.१९८० नंतरचे एक महत्वाचे कवी आहेत. 'हे माझ्या गवताच्या पात्या' व 'मागील पानावरून पुढे सुरु' हे दोन कविता संग्रह त्यांचे प्रसिद्ध आहेत. सशक्त प्रतिमा, जिवंत जीवनानुभव, जळजळीत सत्य मांडण्याची निष्ठा, उपरोधपूर्ण शैली इ. त्यांच्या कवितेचे गुण आहेत. शेतकऱ्यांवरील अन्याय ते प्रभावीपणे मांडतात. राजकीय व सामाजिक भान चांगल्या प्रकारे असणारा हा एक उच्च दर्जाचा कवी आहे.

उत्तम कोळगांवकर हे एक महत्वाचे नाव १९८० नंतरच्या कवितेत आढळते. त्यांच्या कवितेत मोठ्या प्रमाणात ग्रामीण जीवनानुभव प्रकट होत नाही. परंतु, अनेक वेळा ते ग्रामीण शब्द व प्रतिमांचा वापर

आपल्या कवितेत करतात. मानवी जीवनातील एकटेपणा, तुटलेपणा, केविलवाणी परिस्थिती त्यांनी मोठ्या ताकदीने प्रकट केली आहे.

मोहन पाटील यांचा *गाव आणि मातेच्या कविता* हा काव्य संग्रह प्रसिद्ध आहे. कमी प्रमाणात काव्यलेखन कवीने केले असले तरी, ते सकस आहे. भावनात्मकतेला अधिक प्राधान्य देऊन ते कविता लिहिताना दिसतात.

फ.म.शहाजिंदे सर्वसामान्यांची, शेतक-यांची व निधर्मीवादी लोकांची दु:खे ताकदीने मांडतात. रानामध्ये व समाजामध्ये तितकाच तन्मयतेने वावरणारा हा समर्थ कवी आहे. शेतकऱ्यांच्या दु:खांना आपल्या कवितेमध्ये त्यांनी वाट करून दिली आहे.

प्रदीप पाटील हे तरुण कविंपैकी एक उल्लेखनीय कवी होय. *आत्मसंवाद व अंतरीचा भेद* असे दोन काव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत. ग्रामीण भागात वास्तव्य केलेल्या या कवीच्या काही कविता ग्रामीण आहेत. स्वत:शी आत्मसंवाद करत आपला अंतरीचा भेद सांगत हा कवी सर्वसामान्यांशी दु:ख गाथाही गातो. सामाजिक भान चांगल्या प्रकारे व्यक्त करणारा हा कवी ग्रामीण जीवनानुभव मात्र सूक्ष्मपणे व जिवंतपणे चित्रित करण्यात अपयशी ठरतो.

श्रीकांत देशमुख या कवींचा *बळीवंत* काव्यसंग्रह सन १९९७ साली प्रसिद्ध झाला. त्याची लगेच २००२ साली दुसरी आवृत्ती काढावी लागली. यावरून या कवितेची लोकप्रियता लक्षात येते. या कवितेमध्ये बळीवंतांच्या व्यथावेदना चित्रित केल्या आहेत. अभंग छंदाचा समर्थ वापर कवीने केला आहे. एक प्रतिभावंत व जाणकार कवी म्हणून श्रीकांत देशमुख यांच्याकडे पाहिले पाहिजे.

इंद्रजीत भालेराव हे १९९० च्या दशकातील एक महत्वाचे कवी. अस्सल ग्रामीण अनुभव विलक्षण ताकदीने प्रकट करणारा हा कवी. शेत, गाव व तळागाळातील लोकांची दु:खे चित्रित करताना कवी दिसतो. ग्रामीण बोली, रुढी, संकेत यांचा प्रभावी वापर आपल्या कवितेत करताना कवी दिसतो. भाषेचा शुद्धपणा हेही त्यांचे वैशिष्ट्य आहे. अल्पावधीतच लोकप्रिय झालेला कवी म्हणून इंद्रजीत भालेरावांचा उल्लेख करावयास हवा.

या सर्व समकालीन कवींचा विचार करता नारायण सुमंत यांचे वेगळेपणही या ठिकाणी दिसून येते. निसर्ग व वास्तववादी कवितेचा अनोखा मिलाफ त्यांच्या कवितेत दिसतो. त्याप्रमाणे कोणाला जमली नाही. अशी वृक्षांशी एकरुपता स्पष्ट करणारा, त्यांचे गोडवे गाणारा, त्यांचे सौंदर्य प्रकट करणारा

त्याचबरोबर शेतकऱ्यांच्या व्यथा वेदना समर्थपणे प्रकट करणारा हा कवी मराठी ग्रामीण कवितेत आपला एक वेगळा ठसा उमटवतो यात शंकाच नाही.

प्रस्तुत प्रबंधात नारायण सुमंत यांच्या कवितेचा विविध अंगानी विचार केला. कवी नारायण सुमंत यांच्या कवितांची अनेक वैशिष्ठे आपणाला दिसून येतात.

त्यांच्या कवितेमध्ये निसर्ग कविता व वास्तववादी कविता या दोन्ही प्रकारच्या कवितांचा मिलाफ झालेला दिसून येतो. निसर्गाशी तादात्म्य हे त्यांच्या कवितेचे वैशिष्ठ दिसून येते. वृक्षांवर त्यांच्या अनेक कविता आहेत. वृक्षांचे रंग, रूप, नाद, गंध, स्पर्श या विविध अंगानी ते चित्रे रेखाटताना दिसतात. वृक्षांची विविध रूपे त्यांना मोहवतात. मग त्या विविध रूपांची चित्रे काढण्यामध्ये सुमंत आपले भान हरपून जातात. एका ग्रामीण भागामध्ये जन्माला आलेला हा कवी लहानपणापासून वृक्षांच्या सहवासात असणार हे स्वाभाविक आहे. वृक्षांनी लहानपणापासून त्यांच्यावर संस्कार केले असणार. या संस्काराची वेगवेगळी रूपे कवी रेखाटताना दिसतो. मराठी कवितेमध्ये वेगवेगळ्या प्रकारचे कवी होऊन गेले. पण वृक्षांशी इतक्या तन्मयतेने एकरूप होऊन त्यांची चित्रे रेखाटणारा कवी दुसरा आपणास दिसत नाही. खरे तर वृक्षांशी मानवाचे असणारे नाते फार पुरातन आहे. नारायण सुमंत म्हणतात त्याप्रमाणे मानव मानव होण्यापूर्वी पासून वृक्षांच्या सहवासात आहे. मानवाच्या आजच्या प्रगतीत वृक्षांचा वाटाही महत्त्वाचा आहे. परंतु मानव जस जसा प्रगत होत गेला तस तसा तो वृक्षाला विसरू लागला. अन्न, वस्त्र, निवारा या प्राथमिक गरजाही एके काळी वृक्षच मानवाला पुरवत होता. पण मानवाने प्रगती साधल्यानंतर मात्र तो वृक्षांकडे दुर्लक्ष करू लागला. वृक्षांना आपल्या अधिपत्याखाली ठेवू लागला. वृक्षांशी असणारे पूर्वीचे नाते विसरू लागला. सुमंत यांच्या कवितेत मात्र मानवाच्या वृक्षांशी असणा-या या सनातन नात्याचा वेध घेतला आहे. कवी वृक्षांचे महात्म्य सांगताना मानवाचा क्षुद्रपणा व वृक्षांचा मोठेपणा येथे प्रकट करतो. वृक्षांच्या दातृत्वासमोर मानावाचा क्षुद्रपणा येथे प्रकट होतो. त्याचप्रमाणे वृक्ष निसर्ग व मानवी संकटाशी टकरा देत कशा प्रकारे आपला विकास करतो हेही कवी येथे सांगताना दिसतो. वृक्षाचा बहर, त्याच्यावरील संकटे, त्याचे बीजपण, अंकुर, रोप, फूल, फळ, बीज असा एक चक्रात्मक होणारा विकास कवी रेखाटताना दिसतो. प्रतिकूल परिस्थितीत झाडाला बहरण्याचे सनातन पिसे कसे असते हेही नमूद करताना कवी दिसतो. दुष्काळातही झाडे बहरतात हे एक झाडाचे प्राप्त परिस्थितीतील बंडच असते असे कवीला वाटते. सुमंत वृक्षांशी किती एकरुप झाले आहेत हे *रानमैरी* तील झाडे २२,२३,२४ या कवितांतून दिसते. या तीन कवितांतून हादगा, शेवरी, तरटी या झाडांच्या जीवनशैलीनुसार त्यांचे व्यक्तीचित्र कवीने रेखाटले आहे. त्या वृक्षांच्या सूक्ष्म

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

वर्णनातून सुमंतांच्या निरीक्षणशक्तीचा प्रत्यय येतो. मानवाने आपल्या जीभेचे चोचले पुरविण्यासाठी झाडांवर कशी कलमे केली व त्याचे मूळ रुप कसे बदलले हेही कवी येथे नमूद करताना दिसतो. मानवाने वृक्षांचे केलेले बागाळलेपणही कवी येथे व्यक्त करताना दिसतो. थोडक्यात वृक्षांच्या जीवनक्रमांचे त्याच्या विविध रुपांचे कलात्मक व सांस्कृतिक दर्शन कवी घडवितो.

ज्याप्रमाणे कवीच्या निसर्ग कवितांमध्ये कवी कलात्मक दर्शन घडवितो त्याप्रमाणे वास्तववादी कवितांमध्ये प्रखर असंतोष, दु:ख, दारिद्रय व संतापाचे चित्रण कवी करतो. त्यांच्या या कविता दुष्काळ, शेतक-यांचे प्रश्न, त्यांचे दु:ख, त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाभोवती फिरत राहतात. शेतकऱ्याचे निसर्ग, समाज, शासन, प्रशासन, बाजारपेठ, विज्ञान यांच्याशी असणारा सहसंबंधही ही कविता रेखाटते. या संबंधाची विविध अंगे कवी प्रकट करतो. या वास्तववादी कवितांची वैशिष्टये म्हणजे त्यामध्ये कवी अत्यंतिक उपरोधिक भाषा वापरतो. शेतकऱ्यांच्या वेदनेची, दु:खाची पूर्ण जाणीव कवीला असल्यामुळे कवी ही दु:खगाथा प्रभावीपणे मांडतो. शेतक-यांना पिळणा-या चरकाच्या विरोधात दंड थोपटून उभी राहणारी ही कविता आहे. शेतकऱ्यांची सहन करण्याची शक्ती संपत आली आहे. त्यामुळे, या कवितेत संतप्त झालेला शेतकरी संसदेच्या दिशेने जोडा भिरकावण्याची भाषा करतो. त्याचप्रमाणे नांगराचे फाळ शेयटून ठेवतो. फसव्या विज्ञानवादा बद्दलही ही कविता संताप व्यक्त करते. हवामानाचे अंदाज अनेकवेळा चुकीचे ठरतात. आणि त्याचा बळी शेतकरी पडतो. बाजारभावबद्दल तर कवी विस्ताराने विचार करताना दिसतो. मालाबरोबर बाजारात तुझी वेदनाही मांड असे कवी सांगतो. ही बेभरवशाची बाजारी कीडच कुणबिकीला कुरतडते आहे असे कवीला वाटते. या बाजारभावाबरोबर सबसिडी, अनुदानांचे धुकेही शेतकऱ्याला फसविते मग कर्जबाजारी शेतकरी आत्महत्या करतो. मग संसदेतही कृषिप्रधान राष्ट्रांत शेतकऱ्यांनी आत्महत्या करायची नाही तर मग कुणी? अशी टर शेतकऱ्याची उडविली जाते. त्यामुळे, मन उद्विग्न होते. या सर्वच गोष्टींबद्दल कवी संताप व्यक्त करताना दिसतो.

लोकसंस्कृतीच्या व ग्रामसंस्कृतीच्या खुणाही या कवितांमध्ये आढळतात. सटीचं शिपणं, वसा घेणे, रात्रभर शेतामध्ये काम करणे, घाव घालणा-याच्या मुखी ऊस साखर देतो, सुने, वृक्षांचे पूजन इ. अनेक लोकसंस्कृतीच्या खुणा कवितेत दिसतात.

त्याचप्रमाणे ग्रामीण बोलीचा वापरही कवी आपल्या कवितेत करतो. 'हिर्वी माया', 'उफाड्यातलं चांदणं', 'वढाळ', 'शिराळ घेणे', 'बाटक', 'चुळकाभर पाणी', 'भुंडे माळ', 'दिसबुडी', 'इकान' अशा काही

ग्रामीण बोली भाषेतले शब्द कवी आपल्या कवितेत वापरतो. त्यामुळे, या कवितेची आशय घनता वाढते. 'पाषाणझुंज', 'तुकारामणे' असे काही नये शब्दही कवी वापरतो.

प्रतिमा आणि प्रतिकांचा वापर हेही या कवीचे वैशिष्ट्य आहे. प्रतिमा वापरामध्ये विविधता हेही एक वैशिष्ट्य आहे. दृश्य प्रतिमांबरोबर अदृश्य प्रतिमांचा वापरही कवी करतो. त्याशिवाय गंध, नाद, स्पर्श अशा काही स्वरुपाच्या प्रतिमाही ते वापरतात. प्रेमकवितांमध्ये प्रतिमांचा वापर अतिशय उत्कृष्ठ पद्धतीने कवीने केला आहे.

अनेक ठिकाणी कवी चिंतनही करताना दिसतो. *वृक्षवेद* या कवितासंग्रहामध्ये ही चिंतनशीलता अधिक दिसते. वृक्ष समता कशी पाळतात, वृक्ष तपश्चर्या करणाऱ्या मानवाच्या माथ्यावर कशी सावली धरतो. झाडाचे झाडपण नैसर्गिक असते. झाडांना जातपात नसते. पक्षांच्या बाबतीतही झाडे समता बाळगतात. मानव मात्र झाडाच्या तळाशी वेद म्हणतो तेथेच लीद टाकतो. अशा कितीतरी प्रकारे कवी येथे चिंतन करताना दिसतो.

दुष्काळाविषयी कविता हे एक नारायण सुमंतांच्या कवितेचे वैशिष्ट्य आहे. कवी ज्या प्रदेशात राहतो तेथे मोठ्या प्रमाणात दुष्काळ आहे. त्यामुळे साहजिकच दुष्काळाचा विविध अंगानी कवी विचार करताना दिसतो. *जिराईत संध्याकाळी, बाभळीवरल्या, सोयरिक, माढा : एक संदर्भ* अशा अनेक कविता दुष्काळावरील आहेत. दुष्काळ, त्याचा शेतीवर होणारा परिणाम, शेतकऱ्याच्या कुटुंबावर होणारा परिणाम अशा अंगांनी कवी दुष्काळाचा वेध घेतो. दुष्काळाबद्दलची शासनाची चुकीची उपाययोजनाही कवी प्रकाशात आणतो.

नारायण सुमंतांच्या कवितांचा विचार केला तर त्या कविता दिवसेंदिवस प्रगल्भ होताना दिसतात. सुरुवातीच्या काळात कवीवर इतर समकालीन कवींचा प्रभाव होता. यातूनच ते प्रेमकवितेकडे वळले. परंतु या प्रभावातून ते लगेच बाहेर पडले. वृक्षांवर मोठ्या प्रमाणात कविता लिहिताना त्यांना स्वत:ची एक ओळख निर्माण करता आली. त्यातूनच ते अधिक प्रगल्भ होत गेले. सातबारा या काव्यसंग्रहात तर त्यांना वेगळाच सूर सापडला. कवी म्हणून सुरुवातीच्या काळापासून शेवटच्या काळापर्यंत ते प्रगल्भ झालेले दिसतात. कवी म्हणून त्यांनी वेगवेगळे टप्पे पार केले आहेत. *वृक्षवेद* तर त्यांनी एखाद्या खंडकाव्यासारखा लिहिला आहे. त्याचप्रमाणे वास्तववादी कवितेतही प्रखर वास्तव रेखाटण्यात ते यशस्वी ठरले आहेत.

शेवटी हा निष्कर्ष काढता येतो की, इ.स.१९८० नंतरच्या कालावधीमधील नारायण सुमंत हे एक महत्त्वाचे कवी आहेत. निसर्ग कविता व वास्तववादी कविता तितक्याच ताकदीने ते लिहितात. वृक्षांशी

एकरुपता हे एक त्यांचे वेगळेपण आहे. ते वृक्षांशी एकरुप होऊन त्यांचे वर्णन कवितेमध्ये प्रभावीपणे करतात. मराठीत अशी कविता अपवादात्मक लिहिली गेली आहे. त्यामुळे सुमंत यांची कविता वेगळी आणि वैशिष्ट्यपूर्ण ठरते.